PDF Compressor Free Version

# महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ,

10/2, स्टार्की टाऊन, मंगळवारी बाजार, सदर, नागपूर 440 001
दुरध्वनी क्रमांक 0712-2978844
E-mail ID : mahaecotourism@mahaforest.gov.in

ई-मेलद्वारे
क्रमांक:कक्ष-2/योजना/प्र.क्र.403/जंगल सफारी/22-23/ 452 दिनांक : 11 /10/2022

प्रति,

1) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), तथा अध्यक्ष कार्यकारी समिती, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर
2) व्यवस्थापकीय संचालक, एफ.डी.सी.एम.लि. नागपूर
3) प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), म.रा. नागपूर
4) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर
5) प्रधान मुख्य वनसंरक्षक (महा कॅम्पा), म.रा. नागपूर
6) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पुर्व नागपूर
7) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पश्चिम मुंबई
8) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई

**विषय :** चंद्रपूर वनवृत्तांतातील जंगल सफरी पर्यटन विकास आराखडयास मान्यता देणेबाबत.

**संदर्भ :** 1) या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-6/लले/व्यसं/काससभा/भा-3/21-22/543 दि.21/01/2022

2)या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-2यो/प्र.क्र.403/जंगल सफारी/22-23/193 दि.02/08/2022

3) या कार्यालयाचे पत्र क्र.व्यसं/मनिपविमं-सभा/प्र.क्र.121/22-23/242 दि.05/09/2022

4) या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-2यो/प्र.क्र.403/जंगल सफारी/22-23/279 दि.14/09/2022

5) मुख्य वनसंरक्षक (प्रा.), चंद्रपूर यांचे पत्र क्र.कक्ष-2(1)/यो/प्र.क्र/22-23/856 दि.23/09/22

मंडळाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक 16/12/2021 रोजी संपन्न झालेल्या सभेत झालेल्या चर्चे दरम्यान समितीने मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) चंद्रपूर यांना चद्रपूर वनवृत्तात जंगल सफारी पर्यटन विकासाच्या दृष्टीने सर्वकष आराखडा तयार करुन कार्यकारी समितीच्या मान्यतेस्तव सादर करण्याबाबत सूचित केले होते. त्यानुसार मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) चंद्रपूर यांनी त्यांचे पत्र क्रमांक कक्ष-2(1)/योजना/ 2021-22/1334 दिनांक 17/01/2022 अन्वये सविस्तर आराखडा तयार करुन चंद्रपूर वनवृत्ताचे पालक

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संधारण), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कडे सादर करुन त्याची प्रत मंडळाकडे सादर केलेली आहे. सद्य परिस्थितीत प्रत्यक्ष सभा घेण्यावर असलेल्या मर्यादा लक्षात घेऊन मंडळाद्वारे सदर आराखडा वरील संदर्भिय पत्रान्वये ई-मेलद्वारे कार्यकारी समितीचे सर्व पदाधिकारी व समिती सदस्यांना त्यांचे अभिप्राय / मान्यतेस्तव दिनांक 21/01/2022 रोजी पाठविण्यात आलेला होता.

PDF Compressor Free Version

मंडळाच्या कार्यकारी समितीचे शासकीय सदस्य 1) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर 2) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पुर्व नागपूर 3) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पश्चिम मुंबई 4) व्यवस्थापकीय संचालक, फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड, नागपूर व अशासकीय सदस्य 5) श्री. हर्षवर्धन धनवटे 6) श्री. डॉ. विजय घुगे 7) डॉ. उज्वला चक्रदेव व 8) प्रफुल्ल भांबुरकर यांनी सदर आराखडयास सहमती प्रदान केलेली आहे. व्यवस्थापकीय संचालक, MTDC मुंबई यांचे अभिप्राय अप्राप्त आहेत.

9) प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी त्यांचे दिनांक 11/02/2022 चे पत्रान्वये आक्षेप नोंदवून **सदर प्रस्ताव नाकारण्याची शिफारस करण्यात आलेली आहे.**

10) प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी त्यांचे दिनांक 11/02/2022 चे पत्रान्वये आक्षेप नोंदवून, **विषयांकीत प्रस्तावाचे अनुमोदन करणे उचित वाट नाही असे नमूद केले आहे.**

सदर प्रकरणी मा. श्री. सुधीर मुनगंटीवार, तत्कालीन विधानसभा सदस्य, विधीमंडळ लोकलेखा समिती प्रमुख यांनी या क्षेत्रातील स्थानिक जनतेच्या मागण्यांच्या अनुषंगाने दिनांक 01/02/2022 व दिनांक 13/06/2022 चे पत्रान्वये सदर आराखडा मंजूर करण्यास विनंती केलेली होती.

मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), चंद्रपूर यांनी सादर केलेल्या आराखडयात नमुद केल्यानुसार पर्यटन विकासाद्वारे निसर्ग पर्यटनाद्वारे अपेक्षित फायदे नमुद केलेआहेत.

मंडळाचे कार्यकारी समितीच्या 7 शासकीय व 4 अशासकीय सदस्यांपैकी 4 शासकीय व 4 अशासकीय अश्या एकुण 11 पैकी 8 सदस्य तसेच मंडळाचे सदस्य सचीव व व्यवस्थापकीय संचालक सदर प्रस्तावाशी सहमत आहेत.

मंडळाचे उपविधीचे नियम क्रमांक 10 (5) नुसार "मंडळाचे निर्णय उपस्थित असलेल्या आणि मतदान करु शकणाऱ्या सदस्यांच्या साध्या बहुमताने घेण्यात येईल आणि अध्यक्षाला निर्णायक मत असेल"

अशी तरतूद आहे. त्यानुसार मंडळाचे कार्यकारी समितीचे अध्यक्ष तथा प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी दिनांक 05/09/2022 ला सदर प्रस्तावास सहमती प्रदान केली.

PDF Compressor Free Version

मंडळाचे कार्यकारी समितीचे अध्यक्ष तथा प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे अध्यक्षतेखाली दिनांक 03/09/2022 रोजी संपन्न कार्यकारी समितीचे सभेत "जंगल सफारी पर्यटन विकास चंद्रपूर वृत्ताचे आराखडयावर कार्यकारी समितीने 2 सदस्यांचे आक्षेप कायम असल्याने सदर प्रकल्पाचा पुर्नविचार करण्यात यावा, अश्या सुचना देण्यात आल्या होत्या."

त्यानुसार मंडळाद्वारे दिनांक 14/09/2022 चे पत्रान्वये मुख्य वनसंरक्षक (प्रादेशीक), चंद्रपूर यांचे अभिप्राय मागविण्यात आले होते. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशीक), चंद्रपूर यांनी त्यांचे दिनांक 23/09/2022 चे कार्यालयीन पत्राद्वारे त्यांचे अभिप्राय सादर केलेले आहेत. सदर अभिप्रायाद्वारे त्यांनी वर नमुद पर्यटन विकास आराखडयाचे समर्थन केलेले आहे. त्यामध्ये प्रामुख्याने स्थानिक जनसहभाग त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्याबाबतची मागणी, कार्य आयोजनेमधील तरतुदी तसेच प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी यासंबंधात निर्गमित केलेल्या दिनांक 07/02/2002 चे स्थायी आदेशातील सुचना या बाबींचा उल्लेख केलेला आहे.

दरम्यान मा. मंत्री (वने) यांचे दिनांक 06/09/2022 चे पत्रान्वये सदर आराखडयासंबंधात त्वरीत कार्यवाही करणेबाबत सुचना प्राप्त झालेल्या आहेत. वर नमुद केल्यानुसार 8 सदस्यांकडून प्राप्त सहमती व मुख्य वनसंरक्षक (प्रादेशीक), चंद्रपूर यांचे अभिप्राय लक्षात घेता सदर आराखडयास मान्यता देण्याबाबत मंडळाच्या कार्यकारी समितीचे मा. अध्यक्ष तथा प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना शिफारस करण्यात आली होती. त्यांनी सदर आराखडयास दिनांक 03/10/2022 रोजी सहमती प्रदान केलेली आहे.

(महिप गुप्ता)
**सदस्य सचिव**
**व्यवस्थापकीय संचालक,**
**महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ,**
**नागपूर**

**प्रतिलिपी :** मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), चंद्रपूर यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करीता अग्रेषित.